# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 12/02/2020 (बुधवार)
# (सकाळ)

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी विरूद्ध गुन्हा नोंद

1) पो.स्टे. खापा :– अंतर्गत अर्धा किमी अंतरावर जवाहर स्कुल टी पॉईन्ट येथे दिनांक 11/02/2020 चे 12.30 वा. दरम्यान एमच–40/वाय–9927 क्रमांकाचा टिपरचा चालक आरोपी नामे– संदीप पंताबराव शेंदरे, वय 30 वर्ष, रा. बडेगाव याचे वाहन थांबवुन तपासले असता सदर वाहनात विनापरवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 10,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 15,10,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार अशोकसिंग ठाकुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गंगाधर ठाकरे 7249471860 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 12 किमी अंतरावर मौजा वलनी वस्ती येथे दिनांक 11/02/2020 चे 07.15 वा. ते 08.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– जयसिंग रामदास राठोड(तहसिल कार्यालयातील बाबु), वय 40 वर्ष, रा. तहसिल कॉटर, छिंदवाडा हे त्यांच्या स्टाफ सह मौजा वलनी येथे अवैद्यरित्या रेती चोरी पकडन्याकरिता जात होते. दरम्यान आरोपी क्र. 1) रविन्द्र वाडीभस्मे, रा. पिपळा व 2) भारत मनसाराम बोन्द्रे, वय 20 वर्ष, रा. वलनी वस्ती असतांना एक टॅक्टर 125 फुट किंमती 5,000/–रू. तसेच ट्रॅक्टर महिन्द्रा लाल रंगाचा व टॉली लाल रंगाची किंमती 2,00,000/–रू. असा एकुण 2,05,000/–रू. मुद्देमाल मिळुन आल्याने घटनास्थळ पंचनामा कारवाई करीत असतांना ट्रॅक्टर मालकने त्याच्या ट्रॅक्टर मधील भरलेली रेती जबरदस्ती ने शिवीगाळ करून तसेच जिवे मारण्याची धमकी देवुन सदर ट्रॅक्टर मधील रेती खाली करून दिलेल्या आदेशाचे पालन न करता आपले ट्रॅक्टर भरधाव वेगाने घेवुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 186, 504, 506, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 2 ला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहा. फौ. जानुसिंग जाधव 9923104310 हे करीत आहे.

## रेती चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 04 किमी अंतरावर मौजा भानेगाव वस्ती येथे दिनांक 10/02/2020 चे 10.00 वा. ते दिनांक 11/02/2020 चे 10.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविकांत आर कन्डे, वय 35 वर्ष, रा. चनकापुर कॉलनी याने चोरीचा कोळसा भरलेला एमएच– 31/डब्ल्यु– 3276 क्रमांकाचा ट्रॅक्टर व ट्रॉली किंमत 1,75,000/–रू. व कोळसा 5,000/–रू. चा मुद्देमाल पकडला असता आरोपी नामे– क्र. 1) ट्रॅक्टर चालक व 2) बाबु नायडु या दोघांनी कोळसा भरलेला ट्रॅक्टर पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जळते 9673837007 हे करीत आहे.

## चोरी

1) पो.स्टे. काटोल :– दिनांक 28/01/2020 चे 01:15 वा. ते 01:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– संदीप घनश्याम भुतडा, वय 44 वर्ष, रा. लिंगा सावळी शिवार यांचे लिंगा सावळी, ता. काटोल येथे त्यांचे भाऊ नामे– रितेश घनशाम भुतडा याचे नावाने पावने 2 एकर शेती वर केमिकल युनिट आहे. युनिट समोर अंदाजे 20 वर्षाचे चंदणाचे झाड होते. शेजारील अशोक भैस्वार यांनी फोनव्दारे कळविले की चंदणाचे मोठे झाड कोणीतरी कापुन कम्पाउॅन्टच्या बाहेर टाकले. अशा माहिती वरून फिर्यादीने पाहणी केली असता चंदणाचे झाड किंमती अंदाजे 10,000/– रूपयाचे अज्ञात आरोपीने चोरून नेल्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 381, 511 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ जवाहर चव्हाण 9545363121 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 09/02/2020 चे 04:00 वा. ते 07:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– एस मुथ्थुवेल, वय 51 वर्ष, रा. सुप्पन कुरूमपनुर काडु, पा. वेल्लीतिरूपनुर, जि. इरोड, तामिळनाडु हे जाम जि. वर्धा येथुन त्यांचे टीएन–52/एच– 3733 क्रमांकाच्या ट्रक मध्ये माल लोड करून जात होते. दरम्यान चहा पिण्याकरीता थांबले असता, अज्ञात आरोपींनी त्याचे ट्रक मधुन अलोव्हेरा तेल 25 एमएल. चे 50 बॉक्स किं. 2,13,408/–रू., रिव्हीव्ह लिक्वीड 400 ग्रॅ. चा 1 बॉक्स कि. 1992/–रू. असा एकुण 2,15,400/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि चवरे 986772244 या करीत आहे.

# विनयभंग

पो.स्टे. कुही :– दिनांक 11/02/2020 चे 17.00 वा. ते 17:30 वा. दरम्यान 14 वर्षीय फिर्यादी/पीडित हि पेपर देवुन बाहेर घराकडे जाण्यास निघाली असता आरोपी नामे– अभिषेक विष्णु गजभिये, वय 19 वर्ष, रा. अकोली, ता. कुही, जि. नागपूर याने अश्लिील बोलुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ), (1)(आय) भादंवी. सहकलम 8 बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि शुभांगी ताकीत 8766934595 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर